# कल्पक बनू या



डॉ.अशोक निरफराके

■ तुम्हाला स्वत:ची स्टार्टप कंपनी काढायची आहे?

■ तुम्ही अभिकल्प **(डिझाइन)**, वास्तुकला, अंतर्गत सजावट **(इंटीरिअर डेकोरेशन)**, बाह्य सजावट **(लँडस्केपिंग)**, जाहिरात, विपणन **(मार्केटिंग)**, संशोधन व विकास **(रीसर्च अँड डेव्हलपमेंट)**, चेतनारोपण **(ॲनिमेशन)**, दिग्दर्शन **(डायरेक्शन)**, चित्रपटनिर्मिती **(फिल्ममेकिंग)**, व्यवस्थापन **(मॅनेजमेंट)**, आतिथ्य **(हॉस्पिटॅलिटी)**... अशा क्षेत्रांत काम करीत आहात? किंवा त्या क्षेत्रांतले विद्यार्थी आहात? किंवा त्या क्षेत्रांच्या शिक्षणसंस्थांत प्रवेश घेऊ इच्छिता?

■ मग तुम्हाला **नवनिर्मिती (इनोव्हेशन)** करता यायला हवी. त्यासाठी तुमच्यात **'कल्पकता' (क्रिएटिव्हिटी)** हवी.

■ **'कल्पक बनू या'** हे पुस्तक त्यासाठीच आहे.

■ कल्पकतेबाबतचे संशोधन आणि प्रत्येक व्यक्तीत सुप्त रूपात असलेल्या कल्पकतेच्या विकासासाठीचे शैक्षणिक व औद्योगिक संस्थांमधील प्रशिक्षण यांचा २५ वर्षांचा आपला अनुभव लेखकाने या पुस्तकात सोप्या भाषेत मांडला आहे.

■ **कल्पकतेच्या विकासाच्या** वैयक्तिक आणि सामूहिक अशा **अनेक तंत्रांची ओळख,** त्यांच्यामागील सिद्धान्त, त्यांच्या सरावासाठी भरपूर कृतिपाठ **(एक्सरसाइझेस)**.

■ **'कल्पक बनणे' हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे !**




**किंमत ₹ १००**

# कल्पक बनू या

(कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी कृतिपुस्तिका)

डॉ. अशोक निरफराके

शैक्षणिक उपक्रम संशोधिका
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

* **कल्पक बनू या**
(कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी कृतिपुस्तिका)

@ हक्क प्रकाशकाधीन

* **प्रकाशक :**
श्री. वि. शं. देशपांडे
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

* **मुद्रक :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, पुणे

* **अक्षर जुळणी**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

* **मुखपृष्ठ चित्रकार**
गिरीश सहस्रबुद्धे, पुणे

* **आवृत्ती पहिली :** सौर श्रावण,शके १९१७, ऑगस्ट १९९५
* **पुनर्मुद्रण :** सौर पौष, शके १९२१, डिसेंबर १९९९
* **आवृत्ती दुसरी :** सौर पौष, शके १९२८, डिसेंबर २००६
* **आवृत्ती तिसरी :** सौर चैत्र, शके १९३३, एप्रिल २०११
* **आवृत्ती चौथी :** सौर कार्तिक, शके १९३९, नोव्हेंबर २०१७

* **किंमत : ₹ १००**

**Kalpak Banu Ya**
**(Let's Be Creative !)**
A Workbook of General Creativity
by Dr.Ashok Nirpharake, in Marathi

# कै.ती.आप्पा...

## (डॉ.वि.वि.पेंडसे, ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक – संचालक)

*हे कल्पकतेचे चालते बोलते उदाहरण होते.*

*प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना आपण देशाचे आणि समाजाचे काही देणे लागतो याची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी उभारलेल्या 'ज्ञान प्रबोधिनी' या शिक्षणसंस्थेतल्या मौलिकतेची दखल 'लंडन-टाइम्स'ने १९७२ मध्येच खास मुलाखतीद्वारा घेतली होती.*

*'सहविचारात्मक नेतृत्वपद्धती' ही संकल्पना मांडणे, तिच्यावर प्रायोगिक संशोधन करणे आणि तिच्या कार्यवाहीचे प्रयोग करणे हे काम त्यांनी, व्यवस्थापनशास्त्रात 'प्रसंगोचित नेतृत्वपद्धती' (सिच्युएशनल लीडरशिप) रूढ होण्यापूर्वीच केले होते.*

*सामुदायिक उपासना त्यांनी नव्याने रूढ केली – 'प्रार्थना समाजा'च्या रुजू न शकलेल्या प्रयत्नांची पार्श्वभूमी असूनसुद्धा. धार्मिक संस्कारांमध्ये आधुनिक काळाला योग्य अशा सुधारणा त्यांनी केल्या – धर्मनिर्णय मंडळाच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर.*

*आयुर्वेदातल्या औषधांचे होमिओपथीच्या पद्धतीने सूक्ष्मीकरण ही अभिनव कल्पना त्यांनी शोधली आणि कार्यकर्त्यांच्या द्वारे यशस्वी करून दाखवली.*

*मानसोपचारांमध्ये उपासनेचा उपयोग करण्याचे यशस्वी प्रयोग त्यांनी केले.*

*लेखक बनून त्यांनी तरुण मनांना ध्येयवादाचे आवाहन करणारी चरित्रे, पद्ये आणि गद्य प्रार्थना यांचे लेखन केले.*

*इतिहासाच्या अभ्यासातून त्यांनी 'ज्या कालखंडात वीर आणि तत्त्वज्ञ एकाच वेळी परस्परपूरक काम करीत असतात तोच कालखंड राष्ट्राच्या उत्कर्षाचा असतो' असा वेगळा सिद्धांत मांडला.*

*खेळाच्या मैदानावर त्यांनी 'बर्चीनृत्य' शोधले, त्यात लेझिमीप्रमाणे दोन्ही हात*

*गुंतून पडत नाहीत आणि टिपरीनृत्याचा नाजूकपणाही नाही, तर मर्दानीपणा आहे.*

*व्यक्तिगत जीवनात तर ते नेहमीच प्रयोग करीत - पंधरा-वीस प्रकारची धिरडी आणि पौष्टिक पूर्णान्न बनवणे, ब्रशाऐवजी खादीच्या खरखरीत रुमालाने दात घासणे, देशी पोशाखात धोतराला सुरवारीचा अधिक सोयीस्कर पर्याय रूढ करणे, बाराबंदीऐवजी 'बारागुंडी' ही झब्ब्याची नवी तऱ्हा शोधणे, सुरेल बासरी वाजवणे, स्फूर्तिगीतांना चाली लावणे, अॅलेक्झांडर ड्यूमाच्या कादंबऱ्यांचे कथाकथन करणे असे त्या कल्पकतेचे असंख्य आविष्कार !*

*एक शिक्षक आणि संघटनाप्रमुख म्हणून त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांकडून आणि कार्यकर्त्यांकडून सतत नावीन्याची अपेक्षा केली आणि ते दिसताच त्याला उत्तेजन दिले.-त्यांच्याच शब्दांत ते 'धर्म आणि अध्यात्म' यात 'सनातन्यातले सनातनी'असूनसुद्धा!*

*माझे प्रतिभाविषयक संशोधन चालू असताना त्यांनी, ते व्यवहारात वापरण्याजोगे असले पाहिजे असे आग्रहाने सुचवले.*

***म्हणून हे पुस्तक त्यांच्यासाठी...***

***- अशोक***

---

# BE CREATIVE

**Author - Dr. Ashok Nirpharake**

CREATIVITY is your birth-right and you can have it ! Assures you the author of this reader-friendly book.

CREATIVITY —a mental capacity hopefully beyond the reach of the computer, can be developed by changing certain attitudes, absorbing the skills of keen observation and divergent thinking, and practising the techniques like Brain-storming, Attribute Listing, Checklist, Random Word Association etc.

A practical guide book, which also gives necessary theory. Useful for everyone, who needs INNOVATION, who is working in or preparing to enter the field of Education, Management, Design, Interior Decoration, Animation, Advertisement or Research & Development....OR , who just wants to enrich his/her life with the joy of Creativity.

**Price - Hard Bound - Rs. 150**

# प्रस्तावना

सर्जनशीलता (क्रिएटिव्हिटी), प्रतिभा, कल्पकता या गुणांविषयीची जागरूकता हल्ली दिसू लागली आहे; कारण हे गुण केवळ माणसाचेच वैभव आहे असा विश्वास आणि ते तसेच राहील अशी माणसाला वाटणारी आशा ! इतके दिवस माणसाला आपल्या बुद्धीचा आणि त्यातही विशेषत: तार्किक बुद्धीचा अभिमान वाटत होता; पण संगणकाने जोरदार मुसंडी मारली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा उदय झाला आणि संगणकाने कास्पारोव्हसारख्या जगज्जेत्याला बुद्धिबळाच्या डावात हरवले ! त्यामुळे तार्किक बुद्धीबद्दलचा तो अभिमान डळमळीत झाला आणि त्यातून संगणकाने अजून जेथे पाऊल टाकले नाही अशा नवनिर्मितीच्या क्षमतेबद्दल उत्सुकता उत्पन्न झाली. अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तावाल्यांनी संगणकाला कविता रचायला आणि चित्रे काढायला शिकवले आहे; पण अजूनतरी त्या निर्मितीचे स्वरूप 'घुणाक्षर' न्यायाचेच राहिले आहे. म्हणजे वाळवीने लाकूड पोखरल्यामुळे अक्षराची आकृती तयार झाली; पण वाळवीचा तो हेतू नव्हता, तिला आपल्या हातून असे काही झाले आहे याची काही जाणीव नाही आणि ते अक्षर वाचून तिला त्याचा अर्थ लावता येत नाही. त्या आकृतीला अक्षर म्हणतो तो माणूस! त्याचप्रमाणे संगणकाने त्याला दिल्या गेलेल्या सूचनांनुसार जुळवलेल्या शब्दांतून कवितेसारखा अर्थ जाणवतो तो माणसाला !

दुसरीकडे औद्योगिक क्षेत्रात वाढत्या स्पर्धेमुळे आणि ग्राहकांच्या बदलत्या आवडी-निवडींमुळे आपल्या उत्पादनात सतत सुधारणा (इनोव्हेशन्स) करीत राहणे किंवा नवी उत्पादने शोधून काढणे त्या क्षेत्रातल्या लोकांना निकडीचे वाटू लागले आहे. त्यासाठी चाकोरीबाहेरचा विचार करून नव्या कल्पना शोधून काढण्याची तंत्रे लोकांना शिकावीशी वाटू लागली आहेत.

मानसशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र आणि शिक्षणशास्त्र या क्षेत्रांमध्ये प्रतिभेविषयी गेल्या पन्नास-साठ वर्षांपासून तुरळक संशोधन सुरू झाले आणि गेल्या वीस-पंचवीस वर्षांत त्याची गती वाढली. त्याच्या कितीतरी आधी दहाव्या-अकराव्या शतकांत भारतीय काव्यशास्त्रज्ञांनी प्रतिभेचा पद्धतशीर अभ्यास केलेला होता.

पुण्यातील ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेच्या प्रमुख डॉ. उषाताई खिरे यांनी 'सर्जनशीलता, बुद्धिमत्ता आणि व्यक्तिमत्त्व यांच्यातील परस्पर संबंध' या विषयावर पीएच.डी.साठीचे संशोधन केले. त्यानंतर मी स्वत: १९७२ ते १९७७ या काळात 'प्रशिक्षणातून प्रतिभेचा विकास' या विषयावर पीएच.डी.साठीचे संशोधन केले. ते पूर्ण झाल्यावर जपानमधील नागोया विद्यापीठात

‘जपानी संस्कृती आणि प्रतिभा’ अशा विषयावर संशोधन केले. तिथून परत आल्यावर प्रज्ञा मानस संशोधिकेमध्ये आणि ज्ञान प्रबोधिनीच्या प्रशालेमध्ये १९७८ ते १९८९ या काळात प्रतिभाविकसनाचे प्रयोग केले. विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची शिबिरे घेतली. त्या सगळ्या संशोधनावर हे पुस्तक आधारलेले आहे.

वाङ्मयीन प्रतिभेच्या विकासाचा विचार ‘प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास’ या वेगळ्या पुस्तकात केलेला असल्यामुळे तो वगळून सर्वसाधारण कल्पकतेच्या विकासाचा विचार या पुस्तकात मांडलेला आहे. तात्त्विक वादविवादात न शिरता, जड परिभाषा टाळून कल्पकतेच्या विविध पैलूंची येथे ओळख करून दिली आहे. कल्पकतेच्या विकासाची पुष्कळशी तंत्रेही समजावून सांगितली आहेत. ज्ञान प्रबोधिनीतील विद्यार्थ्यांनी त्या वेळच्या प्रयोगांमध्ये लिहिलेल्या उत्तरांचा नमुन्याची उदाहरणे म्हणून वापर केलेला आहे आणि वाचकांना स्वतंत्रपणे सोडवण्यासाठी पुष्कळसे सरावपाठ (एक्सरसाइजेस) दिलेले आहेत. ते सोडवीत सोडवीत वाचकांनी पुढे जावे अशी अपेक्षा आहे.

इयत्ता पाचवी-सहावीच्या विद्यार्थ्यांपासून उत्सुक प्रौढांपर्यंत कोणीही हे पुस्तक वाचू आणि वापरू शकेल. शेवटी खास पालकांसाठी एक आणि शिक्षकांसाठी एक अशी दोन प्रकरणे लिहिली आहेत.

या पुस्तकाला बीजभूत असलेली याच शीर्षकाची लेखमाला ज्ञान प्रबोधिनीच्या ‘छात्र प्रबोधन’ या मासिकातून गेले वर्षभर येत होती. पालकांसाठीचे प्रकरण ‘मनाचा शोध’ या आकाशवाणीवरील भाषणांच्या संकलनात, तर ‘प्रश्नमूर्ती व्हा’ या प्रकरणाचा काही भाग ‘बालवाडी’ मासिकाच्या १९८८ च्या सुट्टी विशेषांकात पूर्वी प्रसिद्ध झाले होते.

‘छात्र प्रबोधन’चे संपादक प्रा.महेंद्र सेठिया यांचा आग्रह आणि त्यांनी पाठवलेले उत्साही अनुलेखक विद्यार्थी-मित्र यांच्यामुळेच हे पुस्तक प्रसिद्ध होऊ शकले. पुस्तकात दिलेली ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या विद्यार्थ्यांच्या कल्पनांची उदाहरणे, श्रीमती कमलताई भट या प्रज्ञा मानसच्या प्रेमळ आजींनी विद्यार्थ्यांच्या वह्यांमधून वेळच्या वेळी टिपून ठेवल्यामुळेच वापरता आली. या सर्वांविषयी मी कृतज्ञ आहे.

हे पुस्तक नुसते वाचून संपवण्याचे नाही. त्यात सुचवलेले सरावपाठ करून नंतर त्यातली तंत्रे स्वतंत्रपणे वापरीत राहिल्यानेच कल्पकतेचा खरा विकास होऊ शकेल. हे करीत असताना वाचकांना येणारे अनुभव त्यांनी सूचना आणि अभिप्राय यांसह जरूर कळवावेत. त्यांचा पुढच्या संशोधनासाठी उपयोग होईल.

**ऑगस्ट, १९९५** **अशोक निरफराके**

# दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

ज्यांनी 'कल्पक बनू या' पुस्तकाची पहिली आवृत्ती किंवा तिचे १९९९ चे पुनर्मुद्रण पाहिले असेल, त्यांच्या लक्षात येईल की आता या पुस्तकाने कात टाकली आहे ! म्हणजे पुस्तकाचे मुखपृष्ठ बदलले आहे. आताच्या चित्रातील मुख्य आकृतीची कल्पना एशर (Escher) नावाच्या चित्रकाराच्या एका रेखाटनावरून साभार घेतली आहे. पण श्री.गिरीश सहस्रबुद्धे यांनी ती स्वतंत्रपणे फुलवली आहे. (काही वर्षांपूर्वी ज्येष्ठ चित्रकार श्री.वसंत सरवटे यांनी 'ललित' मासिकाच्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठासाठी याच रेखाटनाचा उपयोग अगदी वेगळ्या प्रकारे केला होता.) चित्र खालून वर, वरून खाली असे नीट पाहा. खालच्या अर्ध्या भागात तर दाराची एकच भक्कम चौकट दिसते. वरून खाली पाहात यावे, तर दोन भव्य खिडक्या दिसतात; त्यातल्याच एकीतून कल्पनेचा विहंग मुक्त आकाशात भरारी घेतो आहे. एका दरवाज्याचे रूपान्तर दोन खिडक्यांमध्ये – ही काय गंमत आहे? दाराच्या चौकटीवर तो विहंग धडकत कसा नाही? तुम्हीच शोधून काढा.

मलपृष्ठावरही अशीच एक गंमत आहे. 'नवे' असा शब्द तिथे आहे. तो बारकाईने पाहिलात, तर 'जुने' या शब्दाच्या अनेकवार आवृत्तीतून आणि विशिष्ट रचनेतून तो तयार झाला आहे, हे लक्षात येईल. जुन्या-नव्याचा संबंध असाच असतो. डग्लस हाफस्टॅटर नावाच्या संगणक-तज्ज्ञाच्या एका कल्पनेतून हे चित्र सुचलेले आहे.

एम्.सी.एशर (१८९८-१९७२) हा लोकविलक्षण प्रतिभेचा डच रेखाटनकार. माझे मित्र श्री.विजय घाटे यांनी मी पीएच्.डी.चे काम करीत असताना १९७३ मध्ये प्रथम मला त्याच्या चित्रांचे पुस्तक भेट दिले. तेव्हापासून आजतागायत मी एशरच्या प्रेमात आणि विजयच्या ऋणात आहे !

या दुसऱ्या आवृत्तीमध्ये 'चाकोरीचा काच' या नवीन प्रकरणाची भर घातली आहे.'पालकनीती' मासिकाच्या फेब्रुवारी १९९७ च्या अंकात हा मजकूर लेखरूपाने प्रसिद्ध झाला होता. तो उपलब्ध करून दिल्याबद्दल 'पालकनीती' च्या संपादकांना धन्यवाद. त्याशिवाय ठिकठिकाणी माहिती अद्ययावतही केली आहे.

गेल्या दहाअकरा वर्षांत नाशिकचे 'अमृत' व पुण्याचे 'निर्मळ रानवारा' आणि अगदी आत्ता २००६ च्या दिवाळी अंकात 'पालकनीती' या मासिकांनी या पुस्तकातले काही उतारे पुनर्मुद्रित केले. त्यामुळे पुस्तक अजून शिळे झालेले नाही, असा विश्वास वाटला.

पहिल्या आवृत्तीच्या शेवटी शिक्षकांना आवाहन केलेले होते. (ते या आवृत्तीतही आहेच.) त्या आवाहनानुसार - आवाहनामुळेच, असे नव्हे - अनेक शाळांनी व अनेक शिक्षकांनी या पुस्तकाच्या आधारे काही उपक्रम राबवल्याचे वेळोवेळी कळविले आहे. व्यक्तिमत्त्व-विकास-शिबिरे घेणाऱ्या कार्यकर्त्यांना व प्रशिक्षकांना हे पुस्तक उपयुक्त वाटले आहे. याचा आनंद आहे.

**डिसेंबर, २००६** **अशोक निरफराके**

---

# तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने...

या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीनंतर पुस्तकाचे इंग्रजी भाषेत रूपांतर स्वत: लेखकानेच केले व ते 'Be Creative' या नावाने 'ज्ञान प्रबोधिनी'ने प्रकाशितही केले. मोठ्या वयोगटासाठी कल्पकतेचा विकास व उपयोजनाच्या संदर्भात स्वत: लेखकाने घेतलेल्या वेगवेगळ्या कार्यशाळांमधील तंत्रांचा अन् त्यातील उदाहरणांचा समावेश त्यात केला होता. त्याचा समावेश मराठी पुस्तकातही व्हावा असे वाटल्यामुळे या तिसऱ्या आवृत्तीत १६ पानांची भर घातली आहे.

पहिल्या १४ प्रकरणांमध्ये मुद्रिताबाबतच्या काही चुकांची दुरुस्ती सोडल्यास नवीन भर घातलेली नाही. पंधराव्या प्रकरणात, 'संयोगातून नवनिर्मिती'मध्ये 'विजातीय संयोग' आणि 'असंबद्ध शब्दसांगड तंत्र' या तंत्रांची व त्यातील उदाहरणांची भर घातली आहे.

कल्पकतेचा विकास निव्वळ नवनवीन कल्पनांची निर्मिती करण्याइतपतच मर्यादित राहू नये, तर सुचलेल्या कल्पनांची योग्य रीतीने चिकित्सा करणे हेही महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने गटाने मिळून काढलेल्या बहुविध कल्पनांमधून गटानेच 'समुचित अभिप्राय तंत्रा'चा वापर करून कल्पनांची समीक्षा कशी करायची हे सांगणारे नवीन प्रकरण या आवृत्तीत समाविष्ट केले आहे.

विविध सोप्या वा क्लिष्ट समस्या कल्पकतेने सोडविण्यासाठीच्या पायऱ्या अधिक स्पष्ट व्हाव्यात यासाठी आधीच्या आवृत्तीतील 'कल्पक-समस्या परिहार' या प्रकरणाचे नव्याने लेखन केले आहे. गटातील सर्वांचा कल्पना निर्मितीमध्ये सहभाग वाढावा यासाठी 'गोफ गुंफण कल्पनास्फोट' तंत्राची भरही त्यात घातली आहे.

प्रत्यक्षात नवनिर्मितीची प्रक्रिया कशी होते याबाबतचे संशोधन सोप्या भाषेत सर्वांपर्यंत पोहोचावे या हेतूने एका नवीन प्रकरणाची भर या आवृत्तीत घातली आहे. या तिसऱ्या आवृत्तीत नवीन प्रकरणांची, तंत्रांची अन् उदाहरणांची भर पडल्यामुळे विविध वयोगटांसाठीची या पुस्तकाची उपयुक्तता निश्चितच वाढली आहे. लेखक

वाचस्पती अशोकराव निरफराके यांनी नवीन आवृत्तीत भर घालण्याचे तत्काळ मान्य केले व आठ दिवसातच आवश्यक ते सर्व लेखन व मुद्रितशोधन करून दिले. तसेच 'छात्र प्रबोधन'चा युवा कार्यकर्ता श्री. प्रवीण वडनेरे याने तत्परतेने अनुलेखनाचे काम केले. या दोघांमुळे ही तिसरी आवृत्ती अल्पावधीत प्रकाशित करता आली.

गेल्या काही महिन्यांमध्ये महाराष्ट्रातील अनेक कृतिशील अध्यापकांनी मोठ्या संख्येने हे पुस्तक विकत घेतले. त्यांनी प्रकल्पपद्धतीच्या प्रभावी उपयोजनासाठी या पुस्तकाचा वापर केला ही विशेष आनंदाची गोष्ट.

भारत महासत्ता होण्यासाठी या देशातील लाखो-कोट्यवधी लोकांमधील कल्पनाशक्तीचा जाणीवपूर्वक विकास व्हायला हवा आहे. त्यासाठी कार्यरत असलेल्या शिक्षकांना, संघटकांना व मानव-संसाधन-विकास क्षेत्रात काम करत असलेल्या व्यवस्थापकांना या पुस्तकाच्या मराठी/इंग्रजी आवृत्तीचा निश्चितच उपयोग होईल. शालेय विद्यार्थ्यांपासून ते उद्योग व्यवसायांमधील व्यवस्थापकांपर्यंत अन् सामान्य माणसांपासून उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना कल्पनाशक्तीच्या विकासासाठी या पुस्तकातली तंत्रे व उदाहरणे प्रेरणा व गती देतील असा विश्वास वाटतो.

**महेन्द्र सेठिया**

**सौर चैत्र, शके १९३३ / एप्रिल, २०११** संपादक, छात्र प्रबोधन

---

# चौथ्या आवृत्तीच्या निमित्ताने

सहा वर्षांच्या कालावधीनंतर 'कल्पक बनू या' पुस्तकाची चौथी आवृत्ती निघत आहे, याचा आनंद आहे. वाचकांच्या प्रतिसादामुळे हे शक्य झाले.

शालेय शिक्षणक्षेत्रात ज्ञानरचनावाद, प्रकल्प पद्धती, स्वयंशोध (डिस्कव्हरी) पद्धती, 'सिनेक्टिक्स मॉडेल' यांचा बोलबाला वाढला. त्यामुळे या पुस्तकाच्या आशयाची प्रस्तुतताही वाढली. त्यातच शिक्षणतज्ज्ञ प्रा. हेरंब कुलकर्णी यांनी त्यांच्या पुस्तक परिचयात्मक ग्रंथातून 'कल्पक...'ची शिफारस केली. त्यामुळे शिक्षकांचा प्रतिसाद वाढत राहिला.

तिसऱ्या आवृत्तीत जी भर घातली, त्यामुळे शालेय शिक्षणक्षेत्राबाहेरही 'कल्पक...' पोहोचले.

गेल्या पाच-सहा वर्षांत हुरूप आणखी वाढवणारा अनुभव येतो आहे. भारताच्या प्रगतीच्या सध्याच्या टप्प्यामुळे 'नवनिर्मिती' (इनोव्हेशन)चे महत्त्व एकदम वाढले ! खाजगी उद्योग आणि शासन अशा दोघांकडूनही नवी कल्पना घेऊन उभ्या राहणाऱ्या 'स्टार्ट अप्स' ना सक्रिय प्रोत्साहन मिळू लागले. संशोधन व विकास (आर अँड डी) आणि जाहिरात व विपणन (मार्केटिंग) या पारंपरिक क्षेत्रांच्या जोडीने अभिकल्प

(डिझाइन), चेतनारोपण (ॲनिमेशन), लघुपटनिर्मिती, आतिथ्य (हॉस्पिटॅलिटी), इमारतींची अंतर्गत व बाह्य सजावट अशी नवी व्यवसाय क्षेत्रे युवक-युवतींना खुणावू लागली आहेत. त्यांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या वाढते आहे. या सर्व नव्या क्षेत्रांमधील यशासाठी सर्जनशीलता लागते ! पण तिच्या प्रशिक्षणासाठी साहित्य उपलब्ध नाही. 'कल्पक...' आम्हाला उपयोगी पडते आहे, असे त्या क्षेत्रातल्या जाणकारांनी वेळोवेळी भेटून, दूरभाष करून किंवा पत्र लिहून सांगितले. त्या नव्या वाचक वर्गापर्यंत पोहोचावे असा प्रयत्न चौथ्या आवृत्तीद्वारे करतो आहोत.

**ऑक्टोबर, २०१७** **अशोक निरफराके**

---

# लेखक परिचय

## डॉ. अशोक निरफराके

❖ १९६४ साली शालान्त परीक्षेत महाराष्ट्रात सर्वप्रथम

❖ एम. ए.(मानसशास्त्र) परीक्षेत पुणे विद्यापीठात सर्वप्रथम आल्याबद्दल सुवर्णपदक

❖ 'प्रतिभेचा विकास' या विषयावर प्रायोगिक पद्धतीने संशोधन करून पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी

❖ 'जपानी संस्कृती आणि प्रतिभा' या विषयीच्या संशोधनासाठी जपानमधील नागोया विद्यापीठात सव्वा वर्ष वास्तव्य

❖ पुण्यातील ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेमध्ये दहा वर्षे संशोधक प्राध्यापक

❖ त्यानंतरची सुमारे दहा वर्षे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शासकीय अधिकारी, अभियंते, उद्योगधंद्यांतील व्यवस्थापक इत्यादींच्या शेकडो प्रशिक्षण वर्गांमध्ये कल्पकतेच्या विकासासंबंधी मार्गदर्शन

❖ 'नादेशिको' हा मराठी कवितांचा संग्रह प्रकाशित

❖ 'प्रभावी व्यक्तिमत्त्व' या पुस्तिकेचे सहलेखन

❖ 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' या पुस्तकाचे लेखक

❖ 'सप्रेम नमस्कार' या नावाने शेतकरी संघटक श्री. शरद जोशी यांच्याशी झालेला पत्रसंवाद प्रकाशित

❖ सध्या निवृत्त, आधी वेळ ठरवून गप्पांसाठी उपलब्ध

---

**संपर्कासाठी पत्ता :** डॉ. अशोक निरफराके
भवानीकृपा, २६०, सहकारनगर क्र. १, पुणे ४११००९

# अनुक्रमणिका


❖ **प्रकाशकीय** ............................................. ६
❖ **प्रस्तावना** ............................................. ७
❖ **दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने** ........................ ९
❖ **तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने** ...................... १०
❖ **चौथ्या आवृत्तीच्या निमित्ताने** ....................... ११
❖ **लेखक परिचय** ......................................... १२

१. प्रतिभा आणि कल्पकता ................................ १३
२. अवती-भवतीची कल्पकता ओळखा ! ............. ....१९
३. कल्पनाशक्ती वापरण्याची इच्छा ....................... २२
४. चुका करण्याची हिंमत ................................... २७
५. प्रश्नमूर्ती व्हा ! .......................................... २९
६. संवेदनशीलता ............................................. ४०
७. समस्यांचा शोध ........................................... ४६
८. सुचण्याची पहिली पायरी - आठवणे .................. ५१
९. चौकस निरीक्षण ........................................... ५५
१०. कल्पना - विहार .......................................... ६१
११. बहुदिश विचार ............................................ ६९
१२. कल्पकतेची गुरुकिल्ली - कल्पनास्फोट ................ ८१
१३. योजकता .................................................... ९२
१४. तुम्ही सुधारक आहात काय? ........................ १०१
१५. संयोगातून नवनिर्मिती ................................. १०७
१६. नव्या कल्पनांची समीक्षा ............................. ११८
१७. कल्पक समस्या-परिहार ............................... १२४
१८. कल्पकतेचा विकास तुमच्याच हातात.. .............. १३५
१९. चाकोरीचा काच ......................................... १३९
२०. मुलांची कल्पकता आणि पालक ...................... १४४
२१. शिक्षकांसाठी ........................................... १४८
२२. नवनिर्मितीची प्रक्रिया : संशोधन व व्यवहार .......... १५०